पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक) 1649
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा//१८
पुणे १ दिनांक :- 17/10/२०१८

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**द माईड ट्रि एज्युकेशन सोसायटी गुरुगोविंद सोसायटी,प्लॅट नं-३२,इंडियन गॅस एजंन्सिजवळ,संघर्ष कॉलनी, पुणे संचालित विसडम इंटरनॅशनल स्कूल,खराडी ता.हवेली जि.पुणे**

**विषय:-** सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यितत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढकरण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १, ६ व २४) २ जुलै २०१३.
२.क्र एसएफएस-२०१८/ प्र क्र ४९/एसएम -२ दिनांक २०/१/२०१८
३. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील आदेश क्र शिउस /माध्य-२/स्वयंअर्थसहाय्यित शाळा/मान्यता/पुवि-२०१७/६४८०/ दिनांक-१४/९/२०१७

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तींवर नविन शाळा साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | ३ | ४ | | | | |
| १ | **द माईड ट्रि एज्युकेशन सोसायटी गुरुगोविंद सोसायटी,प्लॅट नं-३२,इंडियन गॅस एजंन्सिजवळ,संघर्ष कॉलनी, पुणे संचालित** | **विसडम इंटरनॅशनल स्कूल,खराडी ता.हवेली जि.पुणे** | इंग्रजी | नविन शाळा (सी.बी.एस.सी ) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ १ ली ते इ ८ वी | २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

१ संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२ शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३ या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४ संदर्भ क्रमांक ०२ अन्वयेसन २०१६-१७ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.

५ परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातलठरेल.

६ परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७ शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यितत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१० शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**१)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**२)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१**
**३)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**